India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY
केवळ खाजगी वितरणाकरिता

या अंकाची अनुक्रमणिका :

गुरुदेवांचा प्रवास . . . . . पृष्ठ १ – ४
घोषणा . . . . . पृष्ठ ५
विभागीय कार्यक्रम. . . . . पृष्ठ ६ – ९
प्रकाशाची केंद्रे . . . . . पृष्ठ १०

गुरुदेवांचा प्रवास

रुद्रपूर आणि हलद्वानी

दिनांक १६ जानेवारी रोजी दिल्लीहून मुरादाबाद मार्गे, धुक्यात हरवलेल्या रस्त्यांतून मोठा प्रवास करून गुरुदेवांचे रुद्रपूर येथे आगमन झाले व लगेच त्यांनी सत्संगाचे संचालन केले.

१७ जानेवारीला सकाळी नाश्ता व सत्संग झाल्यानंतर गुरुदेवांनी हलद्वानी येथे जाण्याकरिता प्रस्थान केले. हलद्वानी येथे आश्रम व अभ्यासी कॉलनी बांधण्याकरिता हलद्वानी केंद्रापासून ५ कि.मी. अंतरावर जमिनीची खरेदी करण्यात आलेली आहे. २.२५ एकरांवर आश्रम व ६.५ एकरांवर 'सहजपुरम' ही अभ्यासी कॉलनी उभारण्याची योजना आहे. येथे गुरुदेवांनी प्रसाद वाटला, भूमीपूजनाच्या स्तंभाचे आनावरण केले व सुमारे ३०० अभ्यासींकरिता सत्संगाचे संचालन केले. यानंतर त्यांनी नौकुचिआतल येथे जाऊन तलावाकाठच्या कुटीरात काही काळ विश्रांती घेतली. दुसऱ्या दिवशी सकाळी गुरुदेवांची प्रकृति उत्तम होती आणि सतखोल येथे जाण्यास ते सज्ज होते. उपस्थित अभ्यासींना एक छोटे सिटींग दिल्यानंतर पूज्य गुरुदेवांनी सतखोलकरिता प्रयाण केले.

सतखोल

प्रिय गुरुदेवांची वाट पहाणाऱ्या डोंगराळ केंद्रांतील अभ्यासींना हिमालयाच्या नयनरम्य देखाव्याची साथ लाभली होती. गुरुदेवांचे आगमन सकाळी ११ वाजता झाले. ते प्रसन्न मनस्थितीत होते व उरलेला दिवस त्यांनी आपल्या कुटीरात काम करण्यात घालवला.

१९ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता गुरुदेवांनी ध्यान कक्षात सत्संगाचे संचालन केले व तो पूर्ण दिवस ते अथकपणे काम करित होते.

आदल्या रात्री दातदुखीने हैराण होऊनसुदधा २० तारखेला, बसंत पंचमीच्या दिवशी गुरुदेव लवकर जागे झाले.आपल्या नेहमीच्या आनंदी वृत्तीने, उल्हसितपणे ते सर्वांबरोबर बोलत होते. ध्यान–कक्षात ते सकाळी ६.४५ वाजताच पोचले व डोंगराळ भागातून प्रवास करून आलेले अभ्यासी स्थानापन्न झाल्यावर ७ वाजता त्यांनी सत्संगाची सुरुवात केली. गुरुदेवांच्या म्हणण्याप्रमाणे आत्तापर्यंतच्या सतखोलच्या इतिहासातील सर्वात अधिक म्हणजेच सुमारे ७०० अभ्यासी या वेळी उपस्थित होते.

यावेळी गुरुदेवांनी २ विवाह संपन्न केले. गुरुदेवांच्या कुटीरासमोर सहल–भोजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. काही वेळ त्यांनी अभ्यासींसमवेत व्यतीत केला. यावेळी उत्सवासारखे वातावरण होते. आकाश निरभ्र असून तेजस्वी सूर्यप्रकाशामुळे थंडीच्या दिवसातही वातावरण उबदार बनले होते. संध्याकाळी गुरुदेवांनी डोंगराळ भागातून आलेल्या अभ्यासींची भेट घेतली. गोपेश्वर सारख्या अति–दूरच्या केंद्रातील अभ्यासींना गुरुदेवांना प्रथमत: भेटताना पाहणे हा एक हृदयस्पर्शी अनुभव होता.

गुरुदेवांबरोबरच्या अनौपचारिक संभाषणातील काही मौक्तिके :

मला असे वाटते की श्रद्धा, धैर्य व सहनशीलता हे वेगवेगळे नाहीत. श्रद्धा ही दैवी असते. शिष्य कधी ना कधीतरी आपल्याकडे येईल या श्रद्धेने गुरू त्याची वाट पहात असतो. धैर्याला स्वत:ची अशी जाणीव नसते. आजारी बालकासाठी रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणाऱ्या मातेला आपण निर्भय आहोत याची जाणीव नसते. केवळ प्रेमापोटी धैर्य निर्माण होते. आपल्या आयुष्यात घडणाऱ्या

गुरुदेवांचे कुटीर, जयपूर

चर्चा करताना, जयपूर

ध्यान–कक्षाचे उद्घाटन करताना, अल्वार

अल्वार


जबलपूर

गोष्टींचा आनंदाने स्वीकार केला पाहिजे. जर गुरुदेव माझ्या बरोबर असतील, माझ्या अंतरात असतील, तर काहीही चुकीचे घडू शकणार नाही. जे काही घडेल, चांगले किंवा वाईट, ते माझ्या भल्याकरिताच घडत आहे असा विचार आपण केला पाहिजे.

दिनांक २१ रोजी गुरुदेव सकाळी ७.३० वाजता सतखोल येथून निघाले. मुरादाबादला जाताना रुद्रपूर येथे काही काळ थांबून त्यांनी विश्रांती घेतली. दुसऱ्या दिवशी ते दिल्लीला जाण्यासाठी निघाले. बऱ्याच तासांच्या नीरस प्रवासानंतर गुरगाव येथील विभागीय आश्रमात पोचून त्यांनी विश्राम केला. सुमारे ७५० अभ्यासींकरिता बंधू अजय भट्टर यांनी सत्संगाचे संचालन केले. २४ तारखेला सकाळी गुरुदेवांच्या व अडीच हजार अभ्यासींच्या उपस्थितीत सत्संग झाला.

जयपूर

दिनांक २४ जानेवारी रोजी पूज्य गुरुदेवांचे जयपूर येथे आगमन झाले. गुरगाव ते जयपुर हा प्रवास त्रासदायक असूनही ते ताजेतवाने दिसत होते. गुरुदेव आश्रमात पोहोचताच अभ्यासींच्या मोठ्या समुदायाने त्यांचे स्वागत केले. आश्रमातील गुरुदेवांच्या कुटीराचे बांधकाम चालू असल्याने बंधू सुधीर यांच्या निवासस्थानी गुरुदेवांचा मुक्काम होता. राजस्थान तसेच गुजरात येथील सुमारे २९०० अभ्यासी या ठिकाणी उपस्थित होते व वातावरण प्रेमाने भारलेले होते. २५ जानेवारी रोजी सकाळी गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले व नंतर भजनांचा कार्यक्रम झाला. त्यानंतर गुरुदेवांनी आश्रमाच्या बांधकामाची पाहणी केली, अभ्यासींबरोबर संवाद साधला आणि अनेक योजनांना अंतिम स्वरुप दिले. दिनांक २६ रोजी आश्रमात गुरुदेवांनी संध्याकाळच्या सत्संगाचे संचालन केले. स्वत:ची प्रकृती ठीक नसतानाही बाहेर येऊन काही काळ अभ्यासींबरोबर व्यतीत केला. २७ तारखेच्या सकाळच्या सत्संगानंतर भगिनी निहारिका यांच्या कवितावाचनाचा कार्यक्रम झाला. अनौपचारिक संभाषणात गुरुदेव म्हणाले, "कोणत्याही प्रकल्पाला सुरुवात करण्याआधी विचारसरणी, शक्यता आणि व्यवहार्यता यांचा विचार करणे गरजेचे आहे." २८ तारखेला सकाळी गुरुदेव अल्वार येथे जाण्यासाठी निघाले.

अल्वार

आश्रमाच्या वास्तूच्या उद्घाटनाकरिता गुरुदेव अल्वार येथे काही काळ थांबले. सुमारे ५०० अभ्यासींनी त्यांचे आनंदाने, उत्साहाने व भक्तीपूर्वक स्वागत केले. आश्रमाच्या दक्षिणेकडील दरवाज्यावर उभारण्यात आलेल्या स्तंभाचा गुरुदेवांनी शिलान्यास केला. त्यानंतर फीत कापून त्यांनी आश्रमात प्रवेश केला. सुमारे ५० मिनिटे सत्संगाचे संचालन केल्यानंतर ते अर्धा तास आश्रमाजवळ थांबले, त्यामुळे अनेक अभ्यासींना त्यांना भेटण्याची संधी मिळाली. जेवणानंतर काही काळ विश्रांतीनंतर गुरुदेव मोटारने दिल्ली येथे जाण्यासाठी निघाले. अल्वारला पुन्हा येण्याचे अभिवचन गुरुदेवांनी यावेळी तेथील अभ्यासींना दिले.

जबलपूर

३० जानेवारी रोजी गुरुदेवांनी दिल्ली ते जबलपुर असा विमानप्रवास केला. जबलपूर विमानतळावरुन गुरुदेव आपल्या निवासस्थानी जात असताना सुमारे २००० अभ्यासींनी रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून त्यांचे स्वागत केले.

दिनांक ३१ जानेवारी रोजी मध्य प्रदेशातील विभागीय आश्रमाच्या उद्घाटनाने बसंत उत्सवाची सुरुवात झाली. ब्रिटीश काळातील वास्तुरचनेप्रमाणे बांधलेल्या ध्यान–कक्षाला पाहून गुरुदेवांना खाईस्ट चर्च स्कूल या त्यांच्या शाळेची आठवण झाली. सकाळी साडे–सात वाजता स्तंभाचे अनावरण करून व फीत कापून गुरुदेवांनी नेत्रदीपक अशा ध्यान–कक्षाचे उद्घाटन केले. गुरुदेव ध्यान–कक्षातील आपल्या जागी स्थानपन्न झाल्यानंतरच अभ्यासींनी तेथे प्रवेश केला. सत्संगानंतर हृदयस्पर्शी अशी भजने गाण्यात आली. यानंतर गुरुदेवांनी मोटारीतून परिसराची पहाणी केली.

कडाक्याच्या थंडीत तंबूंमध्ये राहण्याची गैरसोय सोसूनही अभ्यासी आनंदी होते व स्वत:ला भाग्यवान समजत होते. आसमंत एखाद्या दैवी सरोवराप्रमाणे भासत होता.

जबलपूर

आराम–वसतिगृह, वाचनालय, पुस्तकांचे दुकान, मुलांसाठी केंद्र अशा मूलभूत सोयी व सुविधा या ठिकाणी उपलब्ध होत्या.

२ फेब्रुवारी रोजी जेव्हा गुरुदेवांचे ध्यान–कक्षात आगमन झाले, तेव्हा तेथे वेळेआधी जमलेल्या अभ्यासींना पाहून ते अत्यंत आनंदित झाले. "कृपया आपापल्या जागी स्थानापन्न व्हा" असे ते म्हणाले. "जेवणाच्या टेबलावर आपण किती काळ वाट बघू शकतो? अरे लवकर जेवायला द्या. इथेही असेच आहे. आता मी थांबू शकत नाही, मला ध्यान चालू केलेच पाहिजे" असे उद्गार त्यांनी काढले.

सत्संगानंतर बंधू अजय यांनी केलेल्या भाषणात साधनेतील नियमितपणावर भर दिला. लक्ष्याला सतत केंद्रस्थानी ठेवणे व गुरुदेवांनी भंडाऱ्यामध्ये दिलेली स्थिती कायम ठेवणे या मुद्द्यांचाही त्यांनी परामर्श घेतला. गुरुदेवांच्या नव–वर्षाच्या संदेशाची त्यांनी उपस्थितांना आठवण करून दिली व लक्ष्यापर्यंत पोहोचण्याची निकड हृदयांमध्ये उत्पन्न करावी अशी विनंती केली.

संध्याकाळच्या सत्संगानंतर गुरुदेवांनी उपस्थितांसाठी एक भाषण केले. " जो शिस्त पाळतो तो शिष्य होय. असा मनुष्य, जो त्याच्या हृदयाचे ऐकून शिस्त पाळतो, मस्तकाचे ऐकून नव्हे, ज्याची शिस्त प्रेमावर आधारित असते, भीतीवर नाही, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे केवळ शिस्तच त्याला अंतिम ध्येयापर्यंत घेऊन जाऊ शकते याची त्याला जाणीव असते"

सुमारे ३८०० अभ्यासी व ३०० मुले या बसंत उत्सवात सहभागी झाली होती.

नागपूर

नागपूर येथे जाण्याकरिता ३ फेब्रुवारी रोजी गुरुदेवांनी प्रस्थान केले. वाटेत सिओनी येथे काही काळ थांबून त्यांची वाट पाहणाऱ्या ३०० अभ्यासींची त्यांनी भेट घेतली. खुल्या वातावरणात प्रसन्नपणे उपस्थितांशी, विशेषत: बालकांशी त्यांनी संवाद साधला.

दुपारच्या जेवणानंतर गुरुदेव नागपूरच्या दिशेने निघाले व त्यांनी नागपूरपासून सुमारे १२ कि.मी.वर असणाऱ्या आश्रमात थेट जाण्याचे ठरवले. आश्रमात जमा झालेल्या सुमारे १२०० अभ्यासींना प्रिय गुरुदेवांना थेट आश्रमात आलेले पाहून आश्चर्याचा धक्का बसला. साडे–सहा तासांच्या कंटाळवाण्या प्रवासानंतर अल्पकाळ विश्रांती घेऊन गुरुदेव सत्संगाचे संचालन करण्याकरिता उपस्थित झाले. सत्संगानंतरच्या मनोरंजनाच्या कार्यक्रमाचाही त्यांनी आस्वाद घेतला. आश्रमातील रात्रीच्या भोजनानंतर ते मुक्कामाकरिता एका अभ्यासी बंधुंच्या निवासस्थानी रवाना झाले.

दिनांक ४ फ़ेब्रुवारी रोजी आश्रमालगतच्या गृहप्रकल्पाच्या कागद्पत्रांचे वाटप गुरुदेवांच्या हस्ते झाले. 'आत्म्याचा प्रवास' हा नृत्याविष्कार या वेळी सादर करण्यात आला.

गुरुदेवांचा मुक्काम जेथे होता ते घर सुमारे १०० वर्षे जुने असून त्यांच्या स्वत:च्या जबलपूर येथील घराशी साधर्म्य असणारे होते. 'जुन्या काळी विशाल मनाची माणसे होती, म्हणून त्यांनी मोठी घरे बांधली. सध्याच्या संकुचित मनांमुळे घरेही लहान झाली आहेत.' अशी गुरुदेवांनी टिप्पणी केली.

नागपूरकर अभ्यासी जिची आतुरतेने वाट पहात होते त्या गुरुदेवांच्या भेटीमुळे या केंद्राची वाढ होण्यास नक्की सहाय्य होईल यात शंका नाही. संध्याकाळच्या ५.४० च्या विमानाने गुरुदेव कोलकात्यासाठी रवाना झाले.

कोलकाता

४ फेब्रुवारी रोजी कोलकाता विमानतळावर उत्साही अभ्यासी गुरुदेवांच्या स्वागताकरिता उपस्थित होते. ७.२० वाजता सुमारे १०० अभ्यासींसह(९० पेक्षा अधिक परदेशी अभ्यासी) गुरुदेवांचे आगमन झाले व ते थेट आश्रमात गेले. ५ तारखेला सकाळी सुमारे ८०० अभ्यासींच्या उपस्थितीत त्यांनी सत्संगाचे संचालन केले.

६ फेब्रुवारी रोजी सत्संगानंतर बंधू एन. प्रकाश व बंधू पॅट्रीक यांनी प्रश्नोत्तराच्या सत्राचे आयोजन केले होते. हा एक अद्वितीय व स्पष्टीकरण करणारा अनुभव होता व गुरुदेवांच्या अस्तित्वाची अनुभूती संपूर्ण सत्रामध्ये जाणवत होती. स्वयंपाकघरातील स्वयंसेवकांनी गुरुदेवांना भोजन–कक्षात भोजनासाठी निमंत्रित केले आणि गुरुदेवांनी त्याचा स्वीकार केला. त्या संध्याकाळी गुरुदेवांनी अभ्यासींच्या समवेत भोजन ग्रहण केले.

नागपूर

कोलकाता

श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र

दि. ७ फेब्रुवारी रोजी सत्संग सुरु होण्यापूर्वी पू. गुरुदेवांनी पुन्हा एकदा शिस्तीचे महत्व अधोरेखित करणारे भाषण दिले. ते म्हणाले की सत्संग महत्वाचा आहेच पण सत्संगापेक्षाही महत्वाची आहे रोजची साधना आणि काहीही झाले तरी ती चुकविता कामा नये. ते म्हणाले की आपल्या दैनंदिन जीवनामध्ये १० नियमांचा समावेश अश्याप्रकारे केला गेला पाहिजे की कुठल्याही परिस्थितीत त्या नियमांचे पालन करता येऊ शकेल. त्यांनी विनंती केली सर्वांनी आपल्या भौतिक व अध्यात्मिक जीवनातील असलेल्या अपेक्षांमध्ये स्पष्ट फरक केला पाहिजे. अनेकजण काही प्रतिकूल घडले की मिशन सोडून जातात. हे असे घडणे बरोबर नाही कारण आपल्या भौतिक जीवनामध्ये आनंद अथवा दु:खाचे जे काही अनुभव येतात ते केवळ आपल्या संस्कारांमुळे येतात.

सत्संगानंतर भगिनी अपर्णा घोष यांनी काही भजने सादर केली. यानंतर पू. गुरुदेव बंधू अजय भट्टर यांच्या निवासस्थानी रवाना झाले व पूढील तीन दिवस त्यांचा तेथेच मुक्काम होता यादरम्यान त्यांनी अभ्यासींच्या गाठीभेटी घेतल्या व प्रशासनिक कामे मार्गी लावली तसेच ध्यानाचे संचलनदेखिल केले. दि. १० रोजी सकाळी पू. गुरुदेव विमानाने चेन्नईला रवाना झाले.

नविन प्रकाशने

द गुरु ॲन्ड द गोल



हृदयीचे बोल २००५ (कन्नड)

गुरुदेवांची मानवी विकासात भूमिका (तेलुगु)



माझे गुरुदेव (हिन्दी)



सत्योदय (इंग्रजी)



शाश्वत सत्य (इंग्रजी)



शाश्वत सत्य (तामीळ)



हि द वंडर भाग २ (हिन्दी)



माझे गुरुदेव (मल्याळम)



अभ्यासी डायरी



अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम

पनवेल, मुंबई

दि. २५ ते २७ डिसेंबर दरम्यान तीन दिवसीय सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सुमारे ३५ अभ्यासी सहभागी झाले होते. पहिल्या दिवशी पुस्तक वाचन सत्राचे आयोजन केले गेले ज्यामध्ये 'सत्योदय' पुस्तकातील प्रकरणे हिन्दी व इंग्रजीमध्ये वाचण्यात आली. पू. गुरुदेवांचे "प्रेमाचा सागर' या विषयावरील चित्रफित दाखवण्यात आली. दुसऱ्या दिवशी सहजमार्ग साधना व स्वयंसेवा यावर भाषणे झाली. शेवटच्या दिवसाचे सत्र अभ्यासींच्या प्रतीक्रिया जाणून घेउन सुरु करण्यात आले व यानंतर सहिष्णूता, प्रेम व शिस्त याविषयांवर ऊत्स्फुर्त भाषणे झाली. या दिवसाच्या समारोपप्रसंगी प्रत्येक अभ्यासीला त्याचा पू. गुरुदेवांबरोबरच्या प्रथम भेटीचा अनुभव कथन करण्यास सांगण्यात आले. या कार्यक्रमाची संकल्पना होती "पुढे पहाणे' ज्याचा अर्थ स्वत:चे आत्मपरिक्षण करुन ३ 'एम' (मास्टर, मिश्न, मेथड) कडे जाण्यासाठी स्वत:मध्ये बदल घडवून आणणे होय व या तीन दिवसांमध्ये हे पूर्णत: अवलंबले गेले.

भुज आश्रमाचा पायाभरणी समारोह

दि. २४ जानेवारी रोजी भुज केंद्राचे प्रशिक्षक डॉ. एन. ओ. चव्हाण यांनी आश्रमाची पायाभरणी केली. सुमारे ७५ पेक्षा जास्त अभ्यासी यावेळेस उपस्थित होते व या पवित्र प्रसंगी त्यांना पू. गुरुदेवांच्या दिव्य उपस्थितीचा आभास होत होता. आश्रमाची जागा सिटी स्क्वेअर टाऊनशिपने सन २००५ मध्ये दान केली असुन सुमारे ९७८७.३ चौ.यार्ड आहे. ही जागा भुज शहरापासून सुमारे १२ कि.मी. अंतरावर आहे.

श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र

आपल्या प्रिय गुरुदेवांचा ८४ वा जन्मदिवस सोहळा



दिनांक. – जुलै २३ ते २६, २००६
स्थळ – बाबूजी मेमोरिअल आश्रम,
श्री राम चंद्र मिशन, आय.आय.एम. रोड,
लखनऊ (ऊ.प्र) भारत.

प्रिय बंधू आणि भगीनींनो,

प्रणाम! पू. गुरुदेवांच्याच शब्दात "भंडारा म्हणजे एखाद्या सरोवराच्या अत्यंत आल्हाददायक व थंडगार पाण्यामध्ये डुंबण्यासारखे आहे. यामुळे यामध्ये स्नान करणाऱ्या किंवा डुबणाऱ्या अभ्यासीचे जर ते शक्य केले गेले तर अध्यात्मिक पुनर्निर्माण होते"

आपल्या पू. गुरुदेवांच्या ८४ व्या जन्मदिवसानिमित्त होणाऱ्या आनंददायक समारोहाच्या निमित्ताने त्यांच्या अनंत अश्या कृपेमध्ये आपल्याला डुंबण्याची अजून एक संधी दिल्याबद्दल आपण आपल्या गुरुदेवांचे ऋणी आहोत. दि. २२ ते २६ जुलै दरम्यान लखनऊ येथे या भंडाऱ्याचे आयोजन करण्यात येणार आहे व दि. २५ जुलै रोजी आपण सर्व आपल्या प्रिय गुरुदेवांच्या दिव्य भौतिक उपस्थितीमध्ये गुरुपोर्णिमेचा पवित्र दिवस साजरा करणार आहोत.

आपण जगत असलेला प्रत्येक क्षण व घेत असलेला प्रत्येक श्वास हा आपल्या गुरुदेवांनी आपल्याला दिलेल्या अस्तित्वासाठी त्यांच्याप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी उपयोगात येवो.

या महान प्रसंगी प्रेमपूरित हृदयाने व कृतज्ञतेने आपल्या स्वत:ला या विशेष सरोवरात डुबकी मारण्यासाठी आपण सर्वजण एकत्र येऊया.

आपला स्नेही,
अजय भट्टर

निमंत्रण, नोंदणीसाठीची माहिती व लखनऊ प्रवासाची माहिती मिशनच्या संकेतस्थळावर खालील ठिकाणी उपलब्ध आहे

http://www.sahajmarg.org/24july2010/index.jsp

समारोहाविषयीच्या नियमीत घडामोडी जाणुन घेण्यासाठी कृपया याठिकाणी भेट द्यावी. अभ्यासींना लवकरात लवकर व शक्यतो १५ मे २०१० च्या आधी नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.

कुठल्याही स्पष्टिकरणासाठी कृपया येथे संपर्क साधावा
24july.registration@srcm.org or 24july.helpdesk@srcm.org

प्रवासाबद्दलच्या परवानगीची माहिती व अर्जपत्र

मणपक्कम अथवा भारतातल्या इतर एस.आर.सी.एम. आश्रमाला भेट देण्यासाठीची माहिती आता http://www.sahajmarg.org/smww/bma-request-to-visit येथे ऊपलब्ध आहे.

मणपक्कम आश्रमाला भेट देण्यासाठी, पू. गुरुदेवांबरोबर प्रवास करण्यासाठी अथवा भारतामध्ये भंडाऱ्यास उपस्थित रहाण्यासाठी प्रवासाबद्दलची परवानगी घेणे आवश्यक आहे.

ही परवानगी मागणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला त्याच्या/तिच्या प्रशिक्षकाने व क्षेत्रिय समन्वयक किंवा देशप्रमुखाने सिफारिश करणे आवश्यक आहे.

भुतकाळाचे पुनरावलोकन

नोव्हेंबर १९५०: (बाबूजींच्या दैनंदिनीमधून): पूजेपेक्षा गुरुदेवांचे आज्ञापालन करणे हे खूपच चांगले काम आहे. जर कोणी लालाजी महाराजांच्या उद्देश्यपूर्तीसाठी कार्य करित असेल तर मी त्याच्याकडे आपोआपच आकर्षित होतो.



१९५४ – सत्योदय हे पुस्तक सर्वप्रथम सन १९५४ मध्ये प्रकाशित झाले. शेजारिल छायाचित्र त्याचे मुखपृष्ठ दर्शवित आहे.

या पुस्तकामधील उद्धरणे

"आपल्या ध्येयापर्यंत शक्य तितक्या कमीत कमी वेळात पोहोचण्यासाठी अधिरपणा किंवा सततची तळमळ ही सर्वात महत्वाची गोष्ट आहे ज्यामूळे आपली प्रगती वेगवान होते."

"एखाद्या व्यक्तिला अध्यात्मिक व्यक्ति बनविण्यासाठी एक महत्वाची गोष्ट म्हणजे अतिरेक टाळणे. ही खूप विस्तारित संज्ञा आहे व आपल्या जीवनातील प्रत्येक क्रियेचा यामध्ये समावेश होतो. याचाच अर्थ आपल्या सर्व इंद्रियांमध्ये व अंगांमध्ये समतोल आणणे . एखाद्या विशिष्ट उद्दिष्टाकरिता मनावर हलकासाही छाप न पडू देता नैसर्गिकरित्या जेवढे आवश्यक असेल त्यापेक्षा जास्त ही नाही किंवा कमीही नाही."

डिसेंबर १९५७



गुलबर्गा कर्नाटक येथे वार्षिक संमेलनाप्रसंगी पू. बाबुजी महाराजांनी दिलेल्या ईश्वरप्राप्तीसाठीचा सोपा मार्ग या संदेशामधून:

"माझ्या स्वानुभवावरुन मी एकदम सोपी पद्धत सांगत आहे जी सर्वजणांना सहजपणे अनुसरता येईल. जर एखाद्याने त्याचे हृदय विकले म्हणजे दिव्य गुरुला ते सप्रेम भेट दिले तर करायचे असे फारच थोडे शिल्लक रहाते. हे नैसर्गिकरित्या त्याला अनंत सत्यामध्ये विलीन करण्याच्या अवस्थेमध्ये घेऊन येते."

"अजुन एक गोष्ट: सहजसोप्या पद्धतीने हृदय समर्पित करण्यासाठी फक्त इच्छापूर्ण क्रिया आवश्यक आहे. इच्छाशक्ति जेवढी हलकी व सुक्ष्म असेल तेवढाच तिचा प्रभाव जास्त असेल."

साभार सत्योदय, कंप्लीट वर्क्स ऑफ राम चंद्रा भाग ३ (राम चंद्राची आत्मकथा भाग दोन व मॅसेज युनिव्हर्सल मधून)

कृपया दिलेली मार्गदर्शक तत्वे व अर्जप्रक्रिया काळजीपूर्वक पाळावी. सतखोल, क्रेस्ट व मिशनच्या रीट्रीट सेंटरला भेट देण्यासाठी स्वतंत्र परवानगीची आवश्यकता आहे. हे त्या केंद्राच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र

पूज्य लालाजी महाराजांचा जन्मदिवस सोहळा



पूज्य लालाजी महाराजांचा जन्मदिवस सोहळा दि. २ फेब्रुवारी रोजी वसंत उत्सवाच्या स्वरुपात देशभरातील सर्व केंन्द्रांमधे साजरा करण्यात आला. त्याबद्दलचा राज्यानुसार अहवाल खालीलप्रमाणे:

आंध्रप्रदेशातील कोलाकलुरु आणि खम्मम ह्या विभागांमधे पूर्ण दिवसाचा कार्यक्रम आयोजित केला गेला. कोलाकलुरु केंद्रात भाषणें, प्रश्नमंजुषा याव्यतिरीक्त माणूस मोहाला कसा बळी पडतो आणि गुरूदेवांच्या मदतीमुळे तसेच सतत स्मरणामुळे तो या स्थितीमधून यशस्वीपणे कसा बाहेर पडू शकतो हे दर्शवणारी नाटुकली (प्रहसन) सादर केली गेली. खम्मम केंद्रात ह्या कार्यक्रमाला जवळपासच्या उपकेंद्रामधून आलेल्या अभ्यासींसह साधारण १६४ अभ्यासी उपस्थित होते.

आसामच्या गोहत्ती केंद्रात १५० अभ्यासींच्या उपस्थितीत सोहळा साजरा केला गेला. जवळपासच्या गावांतील अभ्यासींकरिता विभागीय आश्रमात उपस्थित राहाण्यासाठी खास सोय करण्यात आली होती. 'श्रद्धा', 'मूर्तस्वरूपातील गुरूदेवांचे महत्व', 'सहजमार्ग आणि भगवद्गीता' ह्याविषयांवरील भाषणे ऐकवली गेली. त्यानंतर लालाजीमहाराजांच्या जीवनावरील दृक्श्राव्यपट दाखवण्यात आला तसेच काही मुल्याधारित कार्यक्रम सादर केले. स्थानिक अभ्यासींना या उत्सवाच्या आयोजनादरम्यांन बरेच काही शिकता आले.

खम्मम

गोहत्ती

झारखंडमधील लालपनीया केंद्रात अत्यंत उत्साहानी व श्रद्धेनी हा सोहळा साजरा केला गेला. सकाळी ७:३० च्या सत्संगानंतर बंधू एन. के. साह ह्यांनी लालाजी महाराजांच्या सर्व शिकवणूकींची उजळणी केली. 'गुरूदेव, संस्था आणि पद्धती' ह्यावर भगिनी रत्ना साह ह्यांनी प्रश्नमंजूषा सादर केली. ह्या कार्यक्रमात सर्वांनाच रस वाटला व अभ्यासी आनंदाने आणि स्वेच्छेनी त्यांत सहभागी झाले. ह्या सत्रामुळे अभ्यासींमध्ये श्रद्धा निर्माण झाली तर कुटूंबातील अभ्यासी नसलेल्या सदस्यांमध्येसुद्धा याविषयीची आवड निर्माण झाली. संध्याकाळच्या सत्संगानंतर सोहळ्याचा समारोप करण्यात आला.

कर्नाट्कांत गुलबर्गा, हुबळी आणि बिदर ह्या केंद्रांमध्ये सोहळ्याचे आयोजन केले गेले होते. गुलबर्गा केंद्रात ह्या शुभ दिवशी १४ जणांनी पहिले सिटींग घेतले. हुबळी केंद्रात पूर्ण दिवसीय कार्यक्रमाला १५० अभ्यासी उपस्थित होते. बिदर केंद्रात आसपासच्या केंद्रांमधील अभ्यासीही उपस्थित होते. हा दिवस लालाजी महाराजांच्या आशिर्वादाने आणि प्रेमाने भारलेला होता.

मंगलोरला पूर्ण दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करून हा दिवस साजरा केला गेला. यावेळी साधारण ५० अभ्यासी उपस्थित होते. दोन सत्संगांसोबतच त्यांनी एका सत्रात पूज्य गुरूदेवांचे 'सेवेतून प्रेमाचा विकास करा' हे भाषण वाचले. सकाळच्या नाश्त्यानंतरचे सत्र अभ्यासींनी सादर केलेली गाणी व भाषणे यांनी परिपूर्ण होते. ह्या भाषणात लालाजी महाराजांचे जीवन आणि त्यांच्या शिकवणूकीवर भर होता. दुपारनंतरच्या सत्रात पूज्य गुरूदेवांचे "प्रेमाचा सागर" ह्या विषयावरील भाषण अभ्यासींना ऐकवले गेले.

नोव्हेंबर २००८ मधील उद्घाटनानंतर प्रथमच, बंगलोरच्या 'परमधाम' आश्रमात संपूर्ण बंगलोर मधील जवळजवळ १,३०० अभ्यासींनी १०० बाळगोपाळांसह पूज्य लालाजी महाराजांचा जन्मदिवस साजरा केला. पू. लालाजी महाराजांच्या जीवनावर आणि त्यांची शिकवण सांगणारी बरीच भाषणे झाली. जास्तीत जास्त अभ्यासींना बघता यावा म्हणून आश्रमाच्या वेगवेगळ्या भागांत सीसीटीव्ही द्वारे 'लालाजी महाराजांचे जीवन' हा चित्रपट दाखवला गेला. संध्याकाळच्या सत्संगानंतर ह्या सोहळ्याची सांगता झाली.

हुबळी

मंगलोर

बंगलोर

अलुवा

मिर्झापूर

कोलकाता

केरळमधील अलुवा, एर्नाकुलम, पलक्कड, पट्टांबी आणि कासारगोड ह्या केंद्रातील आश्रमांत दिवसभर कार्यक्रम आयोजित करुन वसंतोत्सव सोहळा साजरा झाला. दिवसाची सुरूवात ७:३० च्या सत्संगाने झाली. नाश्त्यानंतर लालाजी महाराजांच्या जीवनावरील दृक्श्राव्यपट दाखवण्यात आला. उत्सवात भजने आणि मिशनच्या साहित्याचे वाचनही झाले. पलक्कड केंद्रात पथ्रिपळा, नेम्मारा, कोंगड आणि ओट्टापल्लम केंद्रातून अभ्यासी आले होते.

कासारगोड केंद्रात अभ्यासींना आत्मविश्लेषणात्मक प्रश्नपत्रिका दिली गेली ज्यामध्ये अभ्यासींचे समाजाशी होणारा संवाद, कामाविषयी असलेला त्यांचा दृष्टिकोन, कुटुंब, शारिरीक व मानसिक स्थितीचे निरीक्षण व अध्यात्मिकता इत्यादी विषयांचा समावेश होता. लालाजी महाराजांनी नितीमत्तेला दिलेले महत्व लक्षात घेऊनच ही प्रश्नपत्रिका तयार केली होती. सोहळ्यादरम्यान अभ्यासींना शाश्वत सुख आणि कृतज्ञतापूर्ण वातावरणाचा अनुभव येत होता.

उत्तरप्रदेशातील मिर्झापूर केंद्रात वसंतोत्सव आस्था व उत्साहात साजरा झाला. सकाळच्या सत्संगानंतर विविध विषयांवर भाषणे झाली. भक्तीपूर्ण गीतांबरोबर लालाजीमहाराजांच्या वचनांचे वाचन झाले.

प. बंगालमधील कोलकाता, गंगटोक, राणीगंज आणि सिलीगुडी ह्या केंद्रांमधे उत्साह, हर्ष आणि आंतरिक आनंदात हा सोहळा साजरा झाला. राणीगंज केंद्रात सत्संगानंतर प्रश्नोत्तरांच्या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. कोलकाता केंद्रातील अभ्यासींनी 'व्हिस्पर्स' आणि 'डेली रिफ्लेक्शन्स' मधील संदेश वाचून त्यांच्या अर्थावरती ध्यान केले. संध्याकाळच्या सत्संगापूर्वी लालाजी महाराजांच्या जीवनावरील दृकश्राव्यपट दाखवून सोहळ्याचा समारोप झाला.

महिलांचा अभ्यासगट, कोलकाता

कोलकाता आश्रमातील तरूण महिलांनी पुढाकार घेऊन सहजमार्गातील विविध अंगांचा आपल्या दररोजच्या जीवनाशी असलेल्या संबंधावर चर्चा केली. प्रत्येक आठवड्यात एक विषय निवडून त्यासंबंधित आपले अनुभव कथन करण्यासाठी सदस्यांना आमंत्रित केले गेले. अशाच एका सभेमधे दहा अभिवचनातील एकावर चर्चा झाली 'सर्व लोकांना आपले बांधव समजून त्यांच्याशी त्याप्रमाणे वागा'. कौटुंबिक जीवनातील समस्या उदा. तरूणवयातील मुलांशी कसे वागावे, पाश्चिमात्य संस्कृतिचा वाढता प्रभाव आणि आपल्या जीवनमुल्यांमधील समतोल कसा राखायचा इत्यादिंवर तोडगा शोधायचा प्रयत्न केला गेला. अशाच एका चर्चेत असे जाणवले कि, ज्याप्रमाणे आपण आपल्या मुलांकडून, त्यांच्याच भल्याकरता, आपली जीवनमुल्ये अवलंबण्याची अपेक्षा करतो त्याचप्रमाणे आपल्या गुरूदेवांची मुले या नात्याने आपण सुध्दा आपल्या उन्नतिसाठी त्यांनी सांगितलेल्या गोष्टी पाळायला पाहिजेत. विविध सत्रांमधून रोजनिशी लिहीणे, अहंकार कसा हाताळायचा, वैश्विक प्रार्थना आणि सतत स्मरण अशा विषयांवर चर्चा झाली. प्रत्येक सदस्याला स्वत:चे मत, अडचणी व त्यावरील उपाय इतरांसमोर मांडण्यास बोलावले गेले. जीवनातील परिस्थितींवर चिंतन करून या महिला, सहजमार्गाच्या विविध अंगांना आपल्या दररोजच्या जीवनामधे बिंबवण्याचा प्रयत्न करतात. सदस्यांकडून प्राप्त झालेला प्रतिसाद हेच दर्शवितो की सहजमार्गाची तत्वे अंगिकारताना अशी वैचारिक देवाण–घेवाण त्यांचा आत्मविश्वास वाढवते, विचारांना स्पष्टता देते आणि नविन दालने उघडते.

लालपनियातील सहल

झारखंडमधील रांची आणि लालपनिया केंद्रातील अभ्यासींनी एकत्र येउन सहज मार्गाविषयी चर्चा करण्याबरोबर सहल करण्याचा एक अनोखा कार्यक्रम केला. लालपनिया केंद्राने हा कार्यक्रम आयोजित केला व रांची केंद्राच्या बंधू रामावतार साहू यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. रांचीतून साधारण २० अभ्यासींचे लालपनियाला दि. २६ डिसेंबर रोजी आगमन झाले. टीटीपीएस गेस्ट हाऊसच्या हिरवळीवर लालपनियातील अभ्यासींनी जवळीक निर्माण करणाऱ्या सूर्यप्रकाशात त्यासर्वांचे बंधूभावपूर्ण स्वागत केले. निसर्गरम्य अशा धबधब्यांनी रांचीच्या अभ्यासींना पूर्णपणे प्रफुल्लित केले. तसेच, सहजमार्गाच्या विविध अंगावरील चर्चा ही सुद्धा अतिशय उत्साहवर्धक होती. त्याचा परिणाम म्हणजे, लालपनियातील तीन आणि रांचीमधील एका सदस्याने लगेच पहिले सिटींग घेतले. तेथील आदरातिथ्य, जेवण आणि प्रेम यातून गुरूदेव आपल्या सर्वांवर शांतपणे करित असलेले काम तर जाणवतेच तसेच असे कार्यक्रम आयोजित करण्यास प्रोत्साहनही मिळते.

प्राथमिक पातळीवरील प्रशिक्षण कार्यक्रम

'स्मृती'ने (एस.एम.आर.टी.आय.) अभ्यासींना उपलब्ध करुन दिलेल्या दृक-श्राव्य प्रशिक्षण साहित्यामुळे अभ्यासींना सहजमार्ग ध्यानपद्धतिविषयी स्पष्ट विचार मिळतात. पू. गुरूदेवांच्या दृक-श्राव्य भाषणांच्या चित्रफीतींमुळे अभ्यासींचे लक्ष वेधले जाते. ह्या कार्यक्रमाचे आयोजन 'स्मृती'द्वारा प्रशिक्षीत अभ्यासींद्वारे केले जाते. त्यामुळे कार्यक्रमाच्या आयोजनासाठी लागणारे प्रयत्न कमी होऊन हा प्रशिक्षण कार्यक्रम वेगवेगळ्या केंद्रांत सहजतेने आणि वारंवार आयोजित करता येतो.

खाली नमूद केलेल्या केंद्रांमधे हा कार्यक्रम आयोजण्यात आला होता. येथे सहभागींनी ह्या कार्यक्रमातील घटकांची वाखाणणी तर केलीच पण असे कार्यक्रम वारंवार आयोजण्याची गरज त्यांनी व्यक्त केली जेणेकरून त्यांचा उत्साह वाढून साधना नियमीत होण्यासाठी प्रेरणा मिळेल.

- रायचूरमधे दि. ७ फेब्रुवारीला आयोजित केलेल्या ह्या कार्यक्रमात ३२ अभ्यासींनी सहभाग घेतला.
- नेल्लोर, आंध्रप्रदेश येथे दि. १० जानेवारीला आयोजित केल्यागेलेल्या कार्यक्रमास २८ अभ्यासी उपस्थित होते ज्यामधे बरेचसे तरूण युवक/युवती होते. त्यांना खूप शंका होत्या पण कार्यक्रमाअंती त्यांच्या शंकांचे समाधान झाल्याचे दिसत होते.
- चित्तूर, आंध्र प्रदेश येथे ३ जानेवारी रोजी आयोजित केलेल्या शिबीरास जवळपास ३२ नविन अभ्यासी उपस्थित होते.
- थेनी तमिळनाडू येथे हे शिबीर दि. ७ फेब्रुवारीस झाले. मिशनमधे दोन वर्षांपेक्षा कमी काळ झालेले १५ अभ्यासीं ह्या शिबीरात उपस्थित होते. ह्या केंद्रात अशाप्रकारचा हा पहिलाच कार्यक्रम होता. अभ्यासींचा प्रतिसाद उत्साहजनक होता.
- कोयंबत्तूरजवळील अन्नूर केंद्रात हे शिबीर १४ फेब्रुवारी रोजी आयोजित केले गेले. बंधू पलनी कुमारन यांनी संचलित केलेल्या ह्या शिबीराला २० च्यावर अभ्यासींची उपस्थिती लाभली. नुकत्याच, काही महिन्यांपूर्वी सुरू केलेल्या ह्या केंद्रास ह्या शिबीरामुळे चालना मिळाली.

चित्तूर

अन्नूर

रायचूर

निबंध लेखन स्पर्धा-प्रमाणपत्र वितरण सोहोळा

संयुक्त राष्ट्र अंतरराष्ट्रीय युवक दिनाच्या(१२ ऑगस्ट, २००९) निमीत्ताने आश्रमातर्फे गेल्या वर्षी आयोजित केलेल्या अखिल भारतीय निबंध स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ ७ फेब्रुवारी रोजी वायझॅग आश्रमात संपन्न झाला. सुमारे ८०० विद्यार्थ्यांनी आपापल्या पालक व संस्थाप्रमुखासह यावेळी हजेरी लावली. आंध्रा मेडिकल कॉलेजला सर्वोत्तम कामगिरीसाठी पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी जवळपास ४२० प्रमाणपत्रे वितरीत केली गेली. मानवातील प्रेम, एकात्मता व बंधूभावाचा प्रसार करण्याच्या आपल्या मिशनच्या उद्दिष्टांची खूपजणांनी प्रशंसा केली.

हैदराबाद केंद्राने दि. ७ फेब्रुवारीस विभाग १अच्या (आंध्रप्रदेश-ऊत्तर) विजेत्यांकरिता पुरस्कार सोहळा आयोजला होता. विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांबरोबर विभागीय आश्रमात आमंत्रित केले होते. प्रत्येक विजेत्याला प्रमाणपत्राबरोबर 'माझे गुरूदेव' ह्या पुस्तकाच्या स्पष्टीकृत प्रतिचे वाटप केले गेले. सोहळ्यानंतरच्या छोट्या कार्यक्रमात आपल्या मिशनविषयी आणि मानवतेच्या भल्यासाठी करत असलेल्या कामाविषयी माहिती दिली गेली. नंतर स्पर्धेतील विषयांवर उपस्थितांना आपले विचार मांडण्यास आमंत्रित केले गेले. मुलांना आपले विचार मांडताना ऐकून आनंद होत होता. सगळ्यांनी अशी आशा व्यक्त केली कि केवळ प्रेमच या जगाला एक चांगले स्थान बनवू शकते. काही पालक व शिक्षकांनी मानवतेच्या भल्यासाठी शांतपणे कार्य करणाऱ्या आपल्यासारख्या मिशनच्या कामाची प्रशंसा केली.

विरुधनगर, चिन्नवल्लीकुलम येथे दि. २ फेब्रुवारी रोजी झालेल्या कार्यक्रमात बंधू ए. पी. दुराई, सह-चिटणीस, एस.आर.सी.एम. यांनी प्रमाणपत्रे वितरीत केली. एकंदरीत ४३ विद्यार्थ्यांना ही प्रमाणपत्रे मिळाली. सायंकाळी पालक आणि इतर उपस्थितांकरता एक खुल्या चर्चासत्राचे आयोजनसुद्धा केले गेले.

सुरतेमधे विभागीय विजेत्यांना त्यांच्या पालक, शिक्षक आणि मुख्याध्यापकांच्या उपस्थितीत प्रमाणपत्रे देऊन सन्मानित केले गेले. गुजरात विभागाचे विभागीय समन्वयक बंधू विनय चावडा यांनी ४५ जणांचे स्वागत करत निबंध स्पर्धेविषयी माहिती दिली. डॉ. सुरेन्द्र अगरवाल (केंद्रप्रमुख सुरत) यांनी एस.आर.सी.एम च्या कार्याविषयी माहिती प्रदान केली ज्यात सहजमार्गातील ध्यानपध्दतिचा खास उल्लेख होता.

हानूर

धारवाड

गांधीग्राम

मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रम

गांधीग्राम, तामिळनाडू

लक्ष्मी शैक्षणिक महाविद्यालय, गांधिग्रामच्या शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांसाठी गांधीग्राम ग्रामीण विश्वविद्यालय व गांधीग्राम ट्रस्ट यांनी दोन दिवसांचा मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. दि. ८ व ९ जानेवारी रोजी झालेल्या या कार्यक्रमामध्ये सुमारे २५० जणांनी भाग घेतला. पहिल्या दिवशी भगिनी सीता यांनी मन नियमनाची गरज, पद्धती, मूल्ये, चरित्र निर्माण व जीवनामधील समतोल यावर वक्तव्य केले. दुसऱ्या दिवसामध्ये योगा व सहज मार्ग यावर संगणकाद्वारे सादरीकरण सामिल होते. ध्यान व अध्यात्म यांच्या लाभावरील व्याख्यानेदेखील त्यामध्ये सामील होती. गांधीग्राम ट्रस्टच्या अनाथ बालकांबरोबर केलेले संभाषण या कार्यक्रमामधील ठळक मुद्दा होता. त्यांना संस्थेची प्रार्थना शिकवून त्याचा अर्थ समजावून सांगण्यात आला. स्वयंसेवकांनी लक्ष्मी सेवा संगम सिद्ध औषध निर्माण केंद्राला भेट दिली आणि तेथील कामगारांशी हितगुज केले.

धारवाड, कर्नाटक

दि. ९ जानेवारी रोजी, धारवाड येथील विद्यावर्धक हॉल येथे मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमामध्ये बाल बळगा, जे.एस.एस. स्कूल व इतर शाळांमधील ४० हून अधिक शिक्षकांनी भाग घेतला. सकाळच्या सत्रामध्ये मूल्यांचे महत्व व मुलांमध्ये मूल्ये कशी बाणावीत अशा विषयांवर भगिनी आशा व भगिनी सरोजा यांनी वक्तव्य केले. दुपारच्या सत्रामध्ये बंधू अजित कामत, मनाचे नियमन आणि ध्यान या विषयावर बोलले. सायंकाळी ५ ते ७ दरम्यान भगिनी वरलक्ष्मी यांनी पालकांसाठी एक सत्र घेतले. बालविकास ॲकॅडमीचे अध्यक्ष श्री शंकर हलगट्टी यांनी या कार्यक्रमाची प्रशंसा केली.

कोलकाता

कोलकाता केंद्राने मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या स्वयंसेवकांसाठी दि १० जानेवारी रोजी एक प्रशिक्षण आयोजित केले होते. मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षणाच्या तत्वांची ओळख करुन देणे आणि ती कशी अमलांत आणावीत याचे प्रात्यक्षिक देणे हा या कार्यक्रमाचा हेतु होता. मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षणामध्ये या विचारावर भर दिला जातो कि, कोणालाही काहीही शिकवले जाऊ शकत नाही तर, शिक्षण म्हणजे एखाद्याच्या अंतरातूनच उलगडले जाऊन विद्यार्थ्याच्या सर्वोत्तम गुणाला वाव देणे होय. अध्यात्मिक मूल्यांचे प्रशिक्षण लहान मुलांना प्रात्यक्षिकाद्वारे दिले गेले तर तेच पुढील आव्हानांना तोंड देणारे मजबूत युवक बनतात. मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कसे दिले जावे हे दाखविण्यासाठी सहभागींना बरीच प्रात्यक्षिके करुन दाखविली गेली. या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला आणि बऱ्याच स्वयंसेवकांनी तेथील स्थानिक मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या गटामध्ये सामील होण्याची तयारी दाखविली.

हानूर, कर्नाटक

दि १७ रोजी हानूर येथे शिक्षकांसाठी मुल्याधारित अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केली गेली. या कार्यशाळेमध्ये ३१ शाळांमधून १२ अभ्यासी शिक्षकांसमवेत सुमारे ५० शिक्षकांनी सहभाग घेऊन जवळपासच्या शाळा व शिक्षण संस्थांचे प्रतिनिधित्व केले. चारित्र्यनिर्माण, सहनशिलता वाढविणे, प्रार्थनेचे महत्व अशा विषयांचा त्यात समावेश होता. ३ तास सकाळी व २ तास दुपारी अशा दोन सत्रामध्ये विभागलेल्या या कार्यक्रमाला सहभागींकडून चांगला प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांनी 'ध्येयप्राप्तीसाठी इच्छाशक्तीचे महत्व', 'वेळेचे व्यवस्थापन', 'अध्यात्मिक व भौतिक जीवनांचे एकमेकांशी नाते' या विषयांवर तयार केलेली एक ध्वनिचित्रफीत (Video) या सहभागींसाठी दाखविण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी शिक्षकांनी 'अशा प्रकारचे आणखी काही कार्यक्रम झाले पाहिजेत जेणेकरून मुल्याधारित पद्धती पुढे जाऊन शाळांमध्ये प्रदर्शित केली जाईल' अशी विनंती करुन सकारात्मक प्रतिसाद दिला.

युवा कार्यक्रम, रांची

दि २६ जानेवारी रोजी रांची येथील गुजराती शाळेमध्ये आयोजित केलेल्या एका संम्मेलनामध्ये १४ ते २३ वयोगटामधील ४९ जणांनी भाग घेतला. बंधू ए. के.लाल यांनी संस्थेच्या प्रार्थनेची ओळख करुन दिली आणि सहभागींना शांत मनाने प्रार्थना करण्याची विनंती करण्यात आली. बंधू मनोज तिवारी, व्यक्तिमत्व व चारित्र्य निर्माण यावर बोलले. 'खरे चारित्रनिर्माण म्हणजे सर्व मुखवटे काढून टाकून आपल्या अंतरातील खऱ्या 'मी', दिव्य "मी" ला बाहेर आणणे' हे त्यांच्या भाषणाचे सार होते. सहजमार्गाच्या १० नियमांचे पालन करून जीवनामध्ये नैसर्गिकता आणण्याच्या प्रक्रियेला मदत होऊ शकते. भगिनी सुनन्दा चौहान यांनी १० नियमांची थोडक्यात ओळख करुन दिली आणि नियम ४ ते १० या सात नियमांवर चर्चा करण्यासाठी सहभागींना प्रत्येकी सुमारे ७ जणांच्या ७ विविध गटांमध्ये विभागले गेले. प्रत्येक गटामध्ये एक एक प्रतिनिधी होता आणि गटामधील एकाजणाला गटाचे मत प्रस्तुत करण्यास सांगितले गेले. बऱ्याच गोष्टी प्रस्तुत केल्या गेल्या व त्यांची चर्चा झाली. सहभागींना या कार्यक्रमाबद्दल प्रतिसाद मागितला गेला व बऱ्याच जणांना चर्चेसाठी आणखी जास्त वेळ हवा होता व आणखी असे कार्यक्रम भविष्यात झाले पाहिजेत असे मत दिले गेले.

प्रकाशाचे केंद्र

इन्दौर आश्रम

केवळ दोन अभ्यासींनी या केंद्राची सुरुवात झाली होती आणि आता या केंद्रामध्येसुमारे ६५० नियमित अभ्यासी आहेत. १९८६ मध्ये संस्थापक दिन महोत्सव, १९९१ मध्ये बसंत उत्सव आणि १९९६ मध्ये गुरुदेवांचा जन्मदिन सोहळा अशा मोठ्या समारंभाचे आयोजन करण्याची संधी देऊन गुरुदेवांनी इंदौरच्या अभ्यासींना आपल्या कृपेचा आशिर्वाद दिला आहे.

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेला हा आश्रम रेल्वे स्थानक व बस स्थानकापासून सुमारे ३.५ कि. मी अंतरावरती आहे आणि तिथे सार्वजनिक वाहतुकीद्वारे सहजरित्या पोहोचता येते. ४०५० चौ फूटाची ही जागा जुलै १९९२ मध्ये विकत घेतली होती. गुरुदेवांनी औपचारिकरित्या २९ ऑगस्ट १९९३ मध्ये या जागेचे भूमिपुजन केले व या जागी सत्संग घेतला.

याचे बांधकाम १५ महिन्यांमध्ये पूर्ण झाले व दि २० ते २४ डिसेंबर १९९४ दरम्यान अतिउत्साहाने उद्घाटनाचा कार्यक्रम झाला. या प्रसंगी गुरुदेव उपस्थित होते आणि या परिसरातील अभ्यासी गुरुदेवांच्या उपस्थितीमध्ये आपला आनंद व्यक्त करण्यासाठी या शुभप्रसंगी उपस्थित होते.

२४०० चौ. फूटाचा उंच असा ध्यानकक्ष असून त्यामध्ये एक ८०० चौ. फूटाचा पोटमाळा आहे. स्वयंपाकघर व जेवणाची जागा दुसऱ्या मजल्यावर, शौचालय व एक छोटीशी बाग तळमजल्यावर अशा अभ्यासींच्या मूलभूत गरजांची दखल घेऊन हा आश्रम व्यवस्थित योजनेने बनविला आहे. पोटमाळ्यामध्ये एक कार्यालय, ग्रंथालय आणि पुस्तकांच्या गोदामासाठी जागा केली आहे.

१९९० ते २००२ दरम्यान वरचेवर इंदौरला भेटी देऊन गुरुदेवांनी येथील अभ्यासींवर आपला प्रेम वर्षाव केला आहे. हे केंद्र हळूहळू वाढत गेले आणि लवकरच अभ्यासींच्या वाढत्या संख्येमुळे आश्रमामध्ये जागेची कमतरता भासू लागली. सुदैवाने आश्रमाच्या लगतची ४०५० चौ. फुटाची जागा २८ एप्रिल २००४ मध्ये विकत घेतली गेली. जागेच्या योग्य वापरासाठी २००७ मध्ये जुन्या ध्यानकक्षाला लागूनच एकसंध असा नवीन ध्यानकक्ष बांधला गेला. दि १६ ते १८ फेब्रुवारी, २००९ दरम्यान साजरा केलेल्या या विस्तारित कक्षाच्या उद्घाटनाप्रसंगी सुमारे २००० अभ्यासी उपस्थित होते.

आश्रमाचे पवित्र व शांत वातावरण अभ्यासींच्या गतिविधींना चालना देते. रविवार व बुधवारच्या नियमित सत्संगाव्यतिरिक्त शुक्रवारी सकाळी देखील येथे सत्संग होतो. या आश्रमामध्ये विद्यार्थी व शिक्षकांसाठी मुल्याधारीत अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रम, क्षेत्रीय स्तरावरील अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम, खुले मंच, साधनेप्रत वळविणारे कार्यक्रम, अभ्यास गट, निबंध स्पर्धा इ. अनेक कार्यक्रम घेण्यात आले. गुरुदेवांच्या सूचनेनुसार इंदौर केंद्र मुल्याधारीत अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रमाचा पाठपुरावा नेटाने करीत आहे. गेल्या १० वर्षे उन्हाळी सत्रेही या आश्रमामध्ये घेतली जात आहेत. इन्दौर हे एक मध्यवर्ती केंद्र असल्याने जवळपासच्या लहान मोठ्या केंद्रांसाठी ओळख पत्रे बनविणे, समारंभासाठी नोंदणी करणे, संस्थेच्या प्रकाशनाचे वितरण करणे इ. काम करीत आहे.

अभ्यासी सुरुवातीला नवशिके असल्याने त्यांना काम कसे करावे याबद्दल काही माहिती नव्हती. म्हणून गुरुदेवांना न्युनतम सेवासुविधांसह गैरसोययुक्त वातावरणात रहावे लागले. त्यानंतरच्या त्यांच्या वारंवारच्या आनंददायी भेटींमुळे हे केंद्र आजसारखे नावारुपाला आले. भेटींची योजना आखणे, स्वयंसेवकांचा गट तयार करणे, काम सोपविणे करणे, जवळपासच्या अभ्यासींना निमंत्रण पाठविणे, स्वयंसेवकांबरोबर काम करणे, त्यांच्या समवेत भोजन करणे आणि राहण्याची, भोजनाची व वाहतुकीची जातीने काळजी घेणे अशा रितीने त्यांनी हे सर्व काम खुद्द सांभाळले. ते अभ्यासींना व्यासपीठावर बोलावित असत व त्यांची भाषणे ते ऐकीत असत. आणि त्यानंतर स्वत: काही भाषणे देऊन अचूक वकतृत्व शिकवित असत. त्यांनी खुल्या मंचाचे आयोजन केले आणि शहरातील ख्यातनाम व्यक्तिंना भेटून त्यांच्या शंकांचे निरसन केले. १९९४ मध्ये त्यांनी प्रशिक्षकांची एक परिषद बोलाविली होती आणि त्याचे अध्यक्षपदही भूषविले होते.

प्रकाशाचे हे केंद्र अभ्यासींसाठी व अध्यात्माच्या खऱ्या शोधकांसाठी सदगुरुंचा दिव्य प्रकाश त्यांच्या जीवनामध्ये पसरविणाऱ्या एका दीपस्तंभासारखे आहे.

To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org
© 2009 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. “Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", “SRCM”, “Constant Remembrance” and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.